# दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बॅक लि. अहमदनगर

## मुख्य कार्यालय, अहमदनगर

बॅकिंग/जा.क्र/ 4580 दि.22/03/2021

सर्व शाखधिकारी,

**विषय - बॅकेच्या दि.27.03.2021 रोजी होणा-या ऑन लाईन वार्षिक सर्वसाधारण सभेबाबत**

वरील विषयानुसार बॅकेची दि.27.03.2021 रोजी होणारी वार्षिक सर्वसाधारण सभा ही कोव्हीड 19 मुळे तसेच शासनाच्या ठरवून दिलेलया नियमावलीनुसार ऑन लाईन पध्दतीने करणे आवश्यक आहे. त्यानुसार त्याबाबत तुम्ही खालील पध्दतीने बॅकेच्या तुमच्या शाखेशी संलग्न असलेल्या सभासद संस्थांना मदत करावयाची आहे.

1. तुमच्या शाखेशी संलग्न असलेलया सभासद संस्थांनी तुमचेकडे मोबाईल नं. इ मेल आय डी सह ठराव दिलेले आहेत, त्या संस्थांना त्यांच्या मोबाईल नं. इ मेल आय डी वर एसएमएस व्दारे लिंक दिली जाईल त्या आधारे ती संस्था वार्षिक सर्वसाधारण सभेस ऑन लाईन पध्दतीने उपस्थित राहू शकेल.

2.त्यासाठी तुमची शाखा दि.27.03.2021 रोजी चालू ठेवणे आवश्यक आहे. शाखेतील ऑल इन पीसी वर वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी व्हावयाचे आहे. परंतू त्या दिवशी बॅकेस सुटटी असलेमुळे कोणतेही आर्थिक व्यवहार करु नये.

3. वार्षिक सर्वसाधारण सभा ही ऑन लाईन पध्दतीने असलेमुळे सभेस मोबाईल व्दारे अथवा संगणक,लॅपटॉप व्दारे सभासदांना उपस्थितीत राहता येईल त्यासाठी नेट असणे आवश्यक आहे.परंतु ज्या संस्था सभासदाकडे मोबाईल, संगणक,लॅपटॉप नाहीत अशा संस्थांना आपले शाखेतील ऑल इन पीसी वर तुम्हास त्या सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्यासाठी सहकार्य करावयाचे आहे.त्यासाठी तुम्ही ज्या संस्थेस लिंक व पासवर्ड प्राप्त झाला आहे त्याव्दारे लिंक करुन दयावे.त्या सभासदांना शाखेतील ऑल इन पीसी व्दारे लिंक उघडून दयावी.या बाबतचे सविस्तर सुचना बॅकेच्या वेब साईटवर दिलेल्या आहेत.

4.जर तुमचे शाखेत तुमचे शाखेशी सलग्न असलेलया संस्था सभासद एकापेक्षा जास्त जितके सभासद शाखेत उपस्थित असतील तर प्रत्येक संस्थेच्या सभासदास प्राप्त झालेलया लिंक व पासवर्ड वापरुन त्या संस्थेची उपस्थिती नोंदवावी.

5.जसे एक शाखेत एकापेक्षा जास्त म्हणजे पाच सभासद उपस्थित आहे.तर त्यांच्या पैकी एका सभासदाच्या लिंक व पासवर्ड वर सभेत उर्वरीत चार सभासदांस सभेत सहभागी होता येईल.परंतू उर्वरीत चार सभासदांचा लिंक व पासवर्ड वापरुन साईट ओपन करुन पुन्हा बंद करावी म्हणजे त्यांची उपस्थिती ग्राहय धरली जाईल.

6 हि प्रक्रिया दि.27.03.2021 रोजी दुपारी 12.30 वाजले पासून सुरु करावी. प्रत्यक्ष मिटिंग दुपारी 1.00 वाजता सुरु होणार आहे.

7.तालूका विकास अधिकारी यांनी दि.25/03/2021 रोजी संपर्क साधून या बाबत आढावा ध्यावा व शाखेस सहकार्य करावे..

मुख्य कार्यकारी अधिकारी